नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १७
## फेब्रुवारी २०१०

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि.१८ फेब्रुवारी २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### '' नियुक्त्या ''

<u>विषय क्र. ४७६</u>

'' मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये फेब्रुवारी २०१० अखेर कार्यनिवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या ८ (आठ) मा. सभासदांच्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (५) अन्वये व सन २००७ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील पक्षांच्या किंवा गटांच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देऊन नविन ८ (आठ) मा. सभासदांच्या नियुक्त्या करणे.''

### प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

### स्थायी समितीचे ठराव

<u>विषय क्र. ४७७</u>

संदर्भ :–
१) स्थायी समिती ठराव क्रं.५२६,दि.१८/७/२००६.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. १५७ दि. २४/८/२००६.
३) मा.महा.आयुक्त ठराव क्र. ६/३३ दि. २७/४/२००९.
४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/डॉ.आं.भवन/६६० दि. २९/१२/२००९ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्रं. १३०४, दि.५/१/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथीलसंग्रहालयाबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) श्री.दिलिप वानखेडे यांची आर्य नागार्जुन संग्रहालय यांना दि. १ एप्रिल २००९ पासून ३१ मार्च २०१२ पर्यंत मासिक अनुदान रक्कम रुपये ४,४२९/– प्रमाणे देण्यास.

२) श्री.सुधाकर खांबे यांचे राष्ट्रीय लष्करी संग्रहालय (महार रेजिमेंट) यांना दि. १ एप्रिल २००९ पासून ३१ मार्च २०१२ पर्यंत मासिक अनुदान रक्कम रुपये १,०६३/– प्रमाणे देण्यास.

३) श्री.दिलिप वानखेडे व श्री.सुधाकर खांबे यांच्या बरोबर संग्रहालयाच्या कामकाजाच्या गुणवत्तेवर अनुदान पुढे चालू ठेवावयाचे किंवा नाही यांचे अधिकार पुणे मनपाकडे ठेवून करार करण्यास.

<u>विषय क्र. ४७८</u>

संदर्भ :–
१) स्थायी समिती ठराव क्रं. १४०८ दि.१८/११/२००८.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३७१ दि. २४/११/२००८.
३) साधना ट्रस्ट यांचे दि. १३/७/२००९ चे पत्र.

४) साधना ट्रस्ट यांचे दि. १७/११/२००९ चे पत्र.

५) देणगी नियमावली.

६) मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे क्र. मआ/उपआ(ज)देणगी/६६२,दि.२९/१२/२००९ चे पत्र.

७) स्थायी समिती ठराव क्रं. १३०५, दि.५/१/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

साधना साहित्य ट्रस्ट या संस्थेने दि. ५, ६, ७ डिसेंबर २००८ रोजी साधना साहित्य संमेलन आयोजित केले होते सदर कामासाठी साधना ट्रस्ट यांना देणगी नियमावलीतील दुप्पट रकमेची बिले सादर करणेबाबतची अट क्र. ८(१) व करारनामा करणेची अट क्र. ८(१)(अ) करारनामा करणे आवश्यक या दोन अटी शिथिल करुन सन २००९-१० या आर्थिक वर्षात मंजूर झालेली देणगी र.रुपये दोन लाख आदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४७९**

संदर्भ :- १) मा.उपआयुक्त, पुणे मनपा यांचे पत्र आ.क्र. २००२ दि. ६/८/२००९ चे पत्र.

२) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भवन/६९८ दि. १/१/२०१० चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्रं. १३७०, दि. १२/१/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

बालगंधर्व रंगमंदिर येथील व्ही.आय.पी. रुम ही १० फूट बाय १२ फूट मापाची आहे. राष्ट्रपती महोदय व अनेक व्ही.आय.पी.लोक बालगंधर्व रंगमंदिरात नेहमी येत असतात. अशावेळी सदरची खोली अपुरी पडते. या कारणासाठी व्ही.आय.पी. खोली वाढविणे आवश्यक आहे. अस्तित्वातील इमारतीच्या सौंदर्यात बाधा न येता खोली वाढविणे शक्य आहे. तसेच बालगंधर्व रंगमंदिरात कलाकारांसाठी असलेले लॉजिंगचेही नुतनीकरण करणे या कामासाठी अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधुन रक्कम रुपये २५ लाखाचे वर्गीकरण विकास अभियंता (सु.ऑ.) भवन रचना कार्यालय, सीई२२अे४५८/एस१६-१२५, सन २००९-१० भांडवली कामे, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, (यादी एस-१६), मौलाना अबुल कलाम इमारत कोरेगांव पार्क येथील जागेत अभ्यासिका, ग्रंथालये, देशासाठी जे राष्ट्रपुरुष होवून गेले त्यांची आत्मचरित्र इत्यादीसाठी या खात्यातून विकास अभियंता (सु.ऑ.) भवन रचना कार्यालय, सीई२८अे१९२, सन २००९-१० भांडवली कामे, १८.सांस्कृतिक केंद्र, ४३. बालगंधर्व रंगमंदिर, गणेश कला क्रिडा केंद्र, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, डॉ.आंबेडकर सांस्कृतिक भवन, मौलाना आझाद सभागृह, मनपा प्रेस कमर्शियल इमारत येथे देखभाल दुरुस्तीची कामे करणे या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४८०**

संदर्भ :- १) मा.प्रमोद निम्हण व मा.विनोद ओरसे यांचे दि. ८/१/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १४०६, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्र. ३० मध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल बसविणेसाठी र.रु. ४ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, औंध क्षेत्रिय कार्यालय, सीपीटील९–५/५१, एफ ई १४ अे ११८/डब्ल्यु ५–४५६, वॉर्ड क्र. ३० पाषाण गावठाण येथे समाजमंदिर बांधणे | ४ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्र. ३० मध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल बसविणे | --- | ४ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४८१**

संदर्भ :– १) मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. ११/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४०७, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्र.९८ मध्ये डायस प्लॉट हॉस्पिटलच्या शेजारी अभ्यासिका व ग्रंथालय बांधण्यासाठी र.रू.५ लाख व ढोलेमळा शाळेची प्रवेश कमान बांधणे तसेच विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू.५ लाख असे एकूण र.रु.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८७, शहरात विविध ठिकाणी संरक्षक भिंत बांधणे, (यादी क्र.एस– १५), पान क्र २५१, अ.क्र.१५, वॉ.क्र.९८ डायस प्लॉट झोपडपट्टी कॅनॉल लगत संरक्षक भिंत बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| १) वॉ.क्र.९८ मध्ये डायस प्लॉट हॉस्पिटलच्या शेजारी अभ्यासिका व ग्रंथालय बांधणे | --- | ५ लाख |
| २) ढोलेमळा शाळेची प्रवेश कमान बांधणे तसेच विविध विकासाची कामे करणे | --- | ५ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४८२**

संदर्भ :– १) मा.सौ.उषा जाधव यांचे दि. १३/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४०९, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्र. ३२ राजभवन मधील इंदिरा वसाहतीमध्ये गल्लीबोळ कॉंक्रीट करणेसाठी र.रु. १० लाखाचे व कस्तुरबा वसाहतीमध्ये गल्लीबोळ कॉंक्रीट करणेसाठी र.रू.१० लाख असे एकूण र.रु.२० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २०८, अ.क्र. ५, सुलभ शौचालय बांधणे, (यादी क्र.एस–१९), पान क्र. २६०, अ.क्र. ७, वॉर्ड क्र. ३२ मध्ये सुलभ शौचालय बांधणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉ.क्र. ३२ राजभवन मधील इंदिरा वसाहतीमध्ये गल्लीबोळ कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| २) वॉ.क्र. ३२ राजभवन मधील कस्तुरबा वसाहतीमध्ये गल्लीबोळ कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४८३**

संदर्भ :– १) मा.अभिजित शिवरकर व मा.दिपक बोडके यांचे दि. १३/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४१०, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.८९ मध्ये खालील विविध विकासाची कामे करणे करिता र.रू.५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १०–ख ,वाहतुक नियंत्रण, पान क्र.१५०,अ.क्र. ४६, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे, यादी क्र.एस –३०, पान क्र.२६३ ,अ.क्र.९, पुणे शहरातील पार्किंग रिझर्व्हेशनच्या प्रमुख जागा ताब्यात घेवून बी.ओ.टी.तत्वावर यांत्रिक पार्किंग विकसित करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉर्ड क्र.८९ मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | --- | ४० लाख |
| २) वॉर्ड क्र.८९ मध्ये विविध ठिकाणी लोखंडी बाके करणे | --- | ५ लाख |
| ३) वॉर्ड क्र.८९ मध्ये कचरा उचलणेसाठी घंटागाडी खरेदी करणे | --- | ५ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४८४**

संदर्भ :– १) मा.अभिजित शिवरकर व मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. १३/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४११, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.८९ वानवडी मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, ५.लोकारोग्य, पान क्र.१२८, अ.क्र.८१, शहरात स्मशान भुमिमध्ये विकासाची कामे करणे. (यादी क्र.एस–२४), पान क्र. २४७, अ.क्र. २३, वॉर्ड सभा आरोग्य कोठीमार्फत नागरिकांना थेट सुविधा देणे. (एकूण तरतूद रुपये ७ कोटी) | ५० लाख | --- |

नविन सुचविलेली कामे

| | | |
|---|---|---|
| १) वानवडी काळुबाई मंदिर लगत नाल्यालगत रिटंनिंग वॉल बांधणे. | --- | २० लाख |
| २) वॉर्ड क्र.८९ मध्ये विद्युत लाईन भूमिगत करणे. | --- | ५ लाख |
| ३) वॉर्ड क्र.८९ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ५ लाख |
| ४) वॉर्ड क्र.८९ मध्ये विविध ठिकाणी रस्ते करणे. | --- | १० लाख |
| ५) पुणे मनपा महादजी शिंदे विद्यालय वानवडी येथे विविध विकास कामे करणे | --- | ५ लाख |
| ६) वॉर्डात नागरिकांना ओला व सुका कचरा उचलण्याकरिता प्लॅस्टिक बकेट खरेदी करणे | --- | ५ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**<u>विषय क्र. ४८५</u>**

संदर्भ :- १) मा.राजेंद्र गोरडे यांचे दि. १५/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४१२, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.६२ मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रु.६० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदापत्रक, १० ख वाहतुक नियंत्रण, पान क्र.१५०, अ.क्र.४६, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे. (यादी क्र. एस-३०), पान नं.२६३,अ.क्र.९,पुणे शहरातील पार्किंग रिर्झेव्हेशनच्या प्रमुख जागा ताब्यात घेऊन बी.ओ.टी.तत्वावर यांत्रिक पार्किंग विकसित करणे. (एकुण तरतुद रुपये २२ कोटी) | ६० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉर्ड क्र.६२ मध्ये विविध ठिकाणी लोखंडी बेंचेस बसविणे | --- | ५ लाख |
| २) वॉर्डात नागरिकांना ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी छोटे छोटे प्लॅस्टिक बकेट खरेदी करणे. | --- | ५ लाख |
| ३) वॉर्डात विविध ठिकाणी सेव्हिंग एनर्जी फिटींग बसविणे. | --- | १० लाख |
| ४) वॉर्डात विविध ठिकाणी रस्ते बी.एम.व ए.सी.करणे. | --- | १० लाख |
| ५) वॉर्डात विविध ठिकाणी रस्ते खडीकरण करणे. | --- | १० लाख |
| ६) वॉर्डात विविध ठिकाणी कॉक्रीटींग करणे व इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ७) वॉर्डात विविध ठिकाणी अंडरग्राउंड केबल टाकणे व पोल शिफ्टिंग करणे. | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**<u>विषय क्रं. ४८६</u>**

संदर्भ :- १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ५७२ दि. २०/३/२००१.
२) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(डॉ.आ.भवन)/७४७ दि. १३/१/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्रं. १४३०, दि. १९/१/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथील प्रेक्षागृह व कॉन्फरन्स हॉलच्या नविन भाडेवाढीच्या प्रस्तावास व खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनातील प्रेक्षागृह व कॉन्फरन्स हॉलचे प्रचलित भाडे | | | | | नविन प्रस्तावित भाडे वाढ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कार्यक्रम | आडवार भाडे | सुट्टीचे भाडे | अनामत रक्कम | आडवार भाडे | सुट्टीचे भाडे | अनामत रक्कम |
| १) | प्रेक्षागृह सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम | १,२००/– | १,४००/– | १,०००/– | १,७००/– | २,०००/– | २,०००/– |
| २) | प्रेक्षागृह खाजगी व व्यवसायिक कार्यक्रम | १,३००/– | १,५००/– | १,०००/– | २,०००/– | २,५००/– | २,०००/– |
| ३) | कॉन्फरन्स हॉल सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम | २५०/– | ३००/– | २००/– | ४००/– | ६००/– | ५००/– |
| ४) | कॉन्फरन्स हॉल खाजगी व व्यवसायिक कार्यक्रम | ३५०/– | ४००/– | २००/– | ६००/– | ८००/– | ५००/– |

५) प्रेक्षागृहाच्या भाड्यामध्ये रोस्टम, २ टेबल, फोटो स्टॅण्ड व ५ खुर्च्या पुरविणेस

६) जनरेटर वापरल्यास प्रेक्षागृहासाठी व कॉन्फरन्स हॉलसाठी वापरानुसार प्रति तास र.रुपये ५००/– व १५०/– आकारणेस

७) मा.धर्मादाय आयुक्तांकडील संस्था नोंदणीच्या दाखल्याची विशेष सवलतीसाठीची अट रद्द करणेस

**<u>विषय क्र. ४८७</u>**

संदर्भ :– १) मा. अशोक येनपुरे, मा. हनिफ शेख, मा. उज्ज्वल केसकर व मा. बाबु वागसकर यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १४३३, दि. १९/१/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स्वित्झर्लंड येथे जागतिक सायकलिंग प्रशिक्षक डिप्लोमा कोर्स होणार असून, भारतातून एकमेव राष्ट्रीय विजेता श्री.सुधीर भुजंगा पाटील याची निवड झालेली आहे. तसेच या डिप्लोमा कोर्समुळे देशातील सायकल प्रशिक्षणाचा स्तर उंचावणार असून सायकलिंग क्षेत्रात काहीतरी क्रांती करुन दाखविण्याची उमेद आणि भविष्यात देशाला ऑलिम्पिक पदके मिळविण्यासाठी श्री.सुधीर पाटील यांस मोलाची ठरणार आहे. आणि सध्या भारतामध्ये एकही आंतरराष्ट्रीय दर्जाचा सायकल प्रशिक्षक उपलब्ध नसून नविन प्रशिक्षक या डिप्लोमा कोर्समुळे निर्माण होईल.

तरी श्री.सुधीर पाटील, एक होतकरु, कष्टाळू उमेदवार असून त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे तसेच या डिप्लोमा कोर्ससाठी एकूण ७ लाख खर्च आहे. त्यामुळे ह्या प्रशिक्षणासाठी र.रुपये ३ लाखाचे आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४८८</u>**

संदर्भ :– १) मा. अशोक येनपुरे व मा. शाम देशपांडे यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १४३४, दि. १९/१/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सेवासदन संस्था ही लक्ष्मी रोडवर गेली १०० वर्षे महिलांमध्ये शैक्षणिक काम करते. चालू वर्ष हे संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. त्या संस्थेला महानगरपालिकेकडून र.रुपये ३ लाख देणगी देण्याकरिता र.रू. ३ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १०–ख ,वाहतुक नियंत्रण, पान क्र.१५०, अ.क्र. ४६, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे, यादी क्र.एस –३०, पान क्र.२६३ ,अ.क्र.९, पुणे शहरातील पार्किंग रिझर्व्हेशनच्या प्रमुख जागा ताब्यात घेवून बी.ओ.टी.तत्वावर यांत्रिक पार्किंग विकसित करणे | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>सेवासदन संस्था ही लक्ष्मी रोडवर गेली १०० वर्षे महिलांमध्ये शैक्षणिक काम करते. चालू वर्ष हे संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. त्या संस्थेला महानगरपालिकेकडून र.रुपये ३ लाख देणगी देणे | --- | ३ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४८९**

संदर्भ :– १) मा.हनिफ शेख व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४३५, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

भवानी प्रतिष्ठान संयोजित बॉक्सिंग, सायकलिंग, व्हॉलीबॉल राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये ५ लाख खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४९०**

संदर्भ :– १) मा.सौ.दिपाली धुमाळ व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४३६, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महात्मा फुले मार्केट मधील कृषि उत्पन्न बाजार समितीला भाड्याने दिलेली खोली समितीचे कार्यालय मार्केटयार्ड येथे स्थलांतरीत झाल्याने रिकामी आहे. या खोलीच्या शेजारील जागा पुर्वीपासून अखिल मंडई गणपती मंडळाच्या ताब्यात आहे.

सबब सदरील खोली अखिल मंडई मंडळास भाड्याने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४९१**

संदर्भ :– १) मा.उज्ज्वल केसकर व मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४३८, दि. १९/१/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्री.मच्छिंद्र नामदेव बहिरट यांचे दि. ६/१/२०१० रोजी निधन झाले. त्यांचे रिक्त असणाऱ्या जागेवर त्यांचा मुलगा श्री.निखिल मच्छिंद्र बहिरट यास नगरसचिव कार्यालयाकडे नोकरी देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ४९२**

संदर्भ :– १) मा.उज्ज्वल केसकर यांचे दि.१९/१/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १४५३, दि. १९/१/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

अखिल भारतीय प्रबुध्द साहित्य परिषद, पुणे आयोजित प्रबुध्द कवी संमेलनासाठी र.रुपये १ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विधी समितीचा ठराव

**विषय क्रं. ४९३**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ /सेवि/६२४, दि. ५/१२/२००९ चे पत्र.

२) विधी समिती ठराव क्र. २१, दि. २१/१/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील सल्लागार ( कामगार ) ( वे.श्रे.१०६५० ते २२१५० + मान्य भत्ते ) (वर्ग – १) ( सर्वसाधारण गट ) या पदावर नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादीवरील व प्रतिक्षायादीवरील उमेदवाराची नेमणूक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी ( सर्वसाधारण गट )**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | व सध्याचा हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री.दौंडकर शिवाजी भिकाजी | कामगार कल्याण अधिकारी |

**प्रतिक्षायादी ( सर्वसाधारण गट )**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सध्याचा हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री.माळी उमेश रामचंद्र | क्षेत्रिय अधिकारी,धनकवडी क्षेत्रिय कार्यालय |

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्रं. ४९४**

संदर्भ :– १) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २७.२.२००९ रोजीची नोटीस क्र.टिपीबी/४३०९/७४९/नवि–११ (राजपत्रात प्रसिध्द दि. ६.३.०९ असाधारण भाग १ मध्यउपविभाग) (The free press journal, Mumbai या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्दी दि. ६.३.२००९ )

२) नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे जा.क्र.पुणे विभाग/वि.नि.नि./फेरबदल/कलम ३७ (१ अेअे)/सि.क.रेग्युलेशन/ मनपा/प्रधिकरण/उसंपुवि/१६२३, दि. १४.८.२००९ ( नगर अभियंता यांचेकडील आ.क्र. १८९५, दि. २५.८.२००९ रोजी )

३) मा. महापालिका आयुक्त यांचे मआ/नअ/६६५, दि. २९/१२/२००९ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८४, दि. १३/१/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र शासनाकडील नगर विकास विभाग यांच्याकडे मा.उप लोकायुक्त यांनी बॉम्व व दंगली यासारख्या मानवनिर्मित धोक्यापासून इमारतींचे सुरक्षा व संरक्षण करण्याकरिता विकास नियंत्रण नियमावली करणेबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे महाराष्ट्र शासनाकडील नगर विकास खात्याकडे ठ.क्र.Multiplex / MRD-३३०८/CR-१४१/UD-७ दि. ११/११/०८ व याबाबतचे शुध्दीपत्रक दि. २.१२. ०८ अन्वये विशेष समितीचे संघटन श्री.एम.व्ही.मिरानी ( सार्वजनिक बांधकाम खात्याचे माजी सचिव ) यांच्या अध्यक्षतेखाली नेमणूक करण्यात आली.

सदर विशेष समितीने दि. २०/०२/०९ रोजी त्यांचा अहवाल इमारतीच्या सुरक्षा व संरक्षणाच्या दृष्टीने देण्यात आला. त्यामध्ये प्राधान्याने मानवनिर्मित धोक्यापासून इमारतींचे सुरक्षा व संरक्षण करण्याचे दृष्टीने करावयाच्या उपाय योजना नमूद केलेल्या आहेत. याबाबत शासनाने अशा प्रकारच्या मानवनिर्मित धोक्यापासून होणा–या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी इमारतीच्या सुरक्षा व संरक्षणाच्या दृष्टीने विशेष नियमावली महानगरपालिका व नियोजन समिती यांनी अंमलात आणावयाचे आहे. तसेच विशेष समिती यांनी क्र. No.TPB ४३०९ /७४९/UD – ११ दि. २७/२/०९ अन्वये मा.महा.आयुक्त त्यांच्या पत्रासोबत दिलेल्या शेड्युल सोबत जोडलेले आहे.

सदरची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man made disaster बाबत विशेष नियमावलींचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियंत्रण व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१ अेअे) अन्वये एकत्रितपणे प्रसिध्द केलेला फेरबदलाचा प्रस्तावास कार्यवाही करणे आवश्यक आहे त्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्रं. ४९५</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ./नअ/३७९,दि. २५/८/२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८७, दि. १३/१/२०१०.

विषय – पुणे पेठ घोरपडे सीटीएस नं ३८३/८ टी.पी.स्कीम ।।।,फा लॉ.नं.२८० ब/७ या मिळकतीचे झोनिंग डिमार्केशन देणेबाबत.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

विषयांकिंत मिळकतीचे आजूबाजूचे विकसन रहिवास विभागानुसार झाले असलेने जागेवरील परिस्थितीनुसार तसेच नगर रचना विभागाचा अभिप्राय लक्षात घेता प्रस्तुत मिळकतीकरिता डी. सी. नियमावलीतील नियम क्र. ६.६.२.१ (ii ) अन्वये निवासी विभागाचे झोनिंग डिमार्केशन देणे व त्याप्रमाणे वापर अनुज्ञेय करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्रं. ४९६</u>

संदर्भ :– १) मा. दिपक बोडके व मा. शैलेश चरवड यांचे दि. १३/१/२०१० चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९५, दि. १३/१/२०१०.

---

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –––

सन १९८७ चे वि.यो. आराखडयात कर्वेनगर स.नं. २० शेती विभागात दर्शविलेला होता. तथापि सन २००० मध्ये शेती झोन निवासी करताना या मिळकतीतील वॉटर बॉडी दर्शविलेली आहे. वास्तविक पाहता

१९८७ चे डी.पी. मध्ये गांव नकाशा अथवा जागेवर वॉटर बॉडी नाही यावरून नजरचुकीचे दर्शविल्याचे दिसते.

तरी कर्वेनगर स.नं. २० येथील ९ गुंठे क्षेत्र वि.नि.नि. कलम ६.६.२.१ मधील तरतुदीनुसार सदरची नजरचुकीने दर्शविलेली वॉटर बॉडी नसल्याचे व तो भाग निवासी झोनमध्ये करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४९७**

संदर्भ :– १) मा.अवर सचिव नगर विकास विभाग (न.वि.१३) यांना पाठविलेले पत्र जा.क्र.नअजा/स/४९८, दि. २८/७/०९
२) मा.सहा.संचालक (नगररचना ) पुणे शाखा यांना पाठविलेले पत्र जा.क्र.झो.क्र. ४/१४१६, दि.४/८/०९
३) महाराष्ट्र शासनाकडील पत्र जा.क्र.टी.पी.एस/१८०९/२५०८/सीआर.१९७०/०९ युडी – १३ यांचे दि.२६/८/०९ चे आदेश पत्र.
४) खात्याचे दि.२९/९/०९ रोजीचे निवेदनावरील मा.महा.आयुक्त यांचे आदेश.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/न.अ. /७३२, दि. ११/१/२०१० चे पत्र.
६) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९९, दि. ३०/१/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

भवानी पेठ फा.प्लॉ.नं.३४४/१ व २ स.नं.४९७/२ ( पा.) व ६ ही मिळकत १९८७ च्या मान्य विकास आराखड्यानुसार एम – २० अन्वये स्टेडियमसाठी आरक्षित आहे. सध्या सदर मिळकतीवर जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय,व्यायाम शाळा अस्तित्वात आहे.

दि. ६/१०/०८ च्या शासन निर्णयान्वये येथे अद्ययावत बॉक्सिंग रूम बांधण्यासाठी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमध्ये स्टेडियमसाठी आरक्षित भुखंडावर किती चटईक्षेत्र अनुज्ञेय करावे याबाबत उल्लेख नाही.तसेच विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.३.१.३ नुसार खाजगी मालकीच्या भूखंडावरील लेआऊटमधील मनोरंजनासाठी ठेवलेल्या मोकळ्या जागांमध्ये (Recreationanl open spaces ) क्रिडा आणि मनोरंजनासाठी १५ टक्के बांधकाम अनुज्ञेय आहे. पुणे महानगरपालिकेने प्रस्तुत केलेल्या दि. २५/१०/१९९९ चे कार्यालयीन परिपत्रकानुसार प्ले ग्राऊंड,पार्क, गार्डन इ.मनोरंजनासाठी (Recreationanl purpose ) आरक्षित मिळकतींमध्ये १५ टक्के बांधकाम अनुज्ञेय करण्यात येते.

नियोजित प्रस्तावातील बॉक्सिंग रिंग व इतर वापर हा सुध्दा खेळाचाच भाग असल्याने त्यासाठी ईनडोअर स्टेडियम आवश्यक आहे.

स्टेडियमच्या आरक्षणासाठी डी.सी.रूलमध्ये किती एफ.एस.आय.अनुज्ञेय करता येतो याचा स्पष्ट उल्लेख नसल्याने व स्टेडियम आरक्षणाचे ठिकाणी बॉक्सिंग रिंग अथवा इतर इनडोअर खेळाचा वापर अनुज्ञेय करता येतो याचा उल्लेख नसल्याने संदर्भ क्र.१ व २ अन्वये मा.अवर सचिव नगर विकास विभाग ( न.वि.१३) व मा.सहा.संचालक ( नगर रचना ) पुणे शाखा यांना पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ चे पत्रानुसार मा.महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७ ( १ ) अन्वये कार्यवाही करणेबाबत व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रूल नं.१२ in Appendix R – ७ मध्ये नियम समाविष्ट करणेबाबत निदेश देण्यात आले आहेत.

<u>Direction under section 37 (1) read with section 154</u>

The Pune Municipal Corporation shall initiate modification proposal after following procedure laid down under section 37 of the said Act so as to add Rule No.12 in Appendix R-7 of the said Regulation as follows.

<u>New Rule : No.12 Appendix R-7</u>
<u>STADIUM</u>

12) ( a) 50 % Area of stadium shall be kept open.
(b) On remaining 50% area o.5 F.S.I. of the remaining area shall be allowed.
(c) In stadium Boxing Ring May be allowed.
(d) In stadium area more than 4 Hector, Civic & Cultuyal centre may be allowed ( FSI restricted up to 50% of permissible FSI )

वरीलप्रमाणे नियम पुणे म.न.पा.चे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ केल्यास पुणे शहरामधील स्टेडियमचे आरक्षण असलेल्या ठिकाणी किती एफ.एस.आय.अनुज्ञेय करावा याबाबत मार्गदर्शन मिळणार असल्याने, प्रादेशिक नियोजन न नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही शासनाच्या संदर्भ क्र.३ चे निदेशानुसार करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यवाहीचा भाग म्हणून दै.इंग्रजी व मराठी वृत्तपत्रात व शासकीय राजपत्रात जाहीर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती सूचना मागविणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्रं. ४९८</u>

संदर्भ :- १) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/जनेराशुअ क्र.२/७३६, दि. १२/१/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २००, दि. ३०/१/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे – सिंहगड रस्त्यावर धायरी फाट्याजवळील कालव्यावर उड्डाणपूल बांधणे या कामाचे पूर्वगणनपत्रकास र.रू.२८,१०,४८,८६३/– मु.प्रा.म.अ.१९४९ चे कलम ७२ ( ब ) अन्वये मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्रं. ४९९</u>

संदर्भ :- १) मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे मआ/उआ/सेवि/६५४,दि.२३/१२/०९ चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २०२, दि. ३०/१/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलनि:सारण मंडळाकडून पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले चावीवाला ( वे.श्रे.२७५० ते ५६९० + मान्य भत्ते ) या पदाची वेतनश्रेणी व कामाचे स्वरूप मनपाकडील पाणीवाला (वे.श्रे.२७५० ते ५६९० + मान्य भत्ते ) पदाशी समकक्ष असल्याने ते पाणीवाला पदात रूपांतरीत करणेस तसेच मा.मुख्य सभा ठ.क्र.५३९, दि. २५.२.०९ ने मान्यता मिळालेल्या चावीवाला पदाच्या प्रतिक्षा यादीवरील खुला २ व इमाव २ अशा चार उमेदवारांची पाणीवाला म्हणून नेमणूक करणेस मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ( ५३ ) १ नुसार नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## महिला बाल कल्याण समितीचे ठराव

<u>विषय क्र. ५००</u>

संदर्भ :- १) मा. अति महा. आयुक्त (वि) यांचे मआ/उआ/से/६६७, दि. २९/१२/२००९ चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ६५, दि. १३/१/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाच्या आरोग्य खात्यातील सिनिअर सॅनिटरी इन्सपेक्टर ( वे.श्रे.रू.५०००/– ते रू. १११२५/– + मान्य भत्ते ) या हुद्याच्या जागांवर बढतीने करावयाच्या नेमणूकांसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवड /प्रतिक्षायादीस सेवकांच्या निवड/प्रतिक्षा यादीवरील क्रम, मागासवर्गीय अनुशेष/आरक्षण, रिक्त जागांची उपलब्धता. शासनाकडील वेळोवेळीचे आदेश इत्यादी सेवकवर्ग विषयक बाबींचा विचार करून मा. महापालिका आयुक्त यांनी वेळोवेळी बढतीने नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवड यादी**

**पदाचे नांव : सिनिअर सॅनिटरी इन्सपेक्टर ( वे.श्रे.रू.५०००/– ते रू. १११२५/– + मान्य भत्ते )**

| अ.क्रं. | सेवकांचे नांव | सॅनिटरी इन्सपेक्टर जागेवरील नेमणूक दिनांक | जातीचा गट |
|---|---|---|---|
| १) | श्री. ज्योतिराम दिनकर भांडवलकर | १३/०१/१९९३ | खुला |
| २) | श्री. शिवाजी हनुमंता केंगार | १५/१०/१९९३ | अ.जा. |
| ३) | श्री. उत्तरेश्वर दिंगबर कांबळे | १५/१०/१९९३ | अ.जा. |
| ४) | श्री. दत्तात्रय लक्ष्मण क्षिरसागर | २८/१२/१९९४ | अ.जा. |
| ५) | श्री. शैलेंद्र गिता गोरगे | २८/१२/१९९४ | वि.जा.(अ) |
| ६) | श्री. दगडू बुधा साबळे | ८/३/१९९६ | अ.ज. |
| ७) | श्री. रमेश तुकाराम राशिनकर | १३/१/१९९९ | भज (क) |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्रं. | सेवकांचे नांव | सॅनिटरी इन्सपेक्टर जागेवरील नेमणूक दिनांक | जातीचा गट |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिलिप बबनराव आल्हाट | १५/१०/१९९३ | खुला |
| २) | श्री. विश्वास शिवाजी चव्हाण | १५/१०/१९९३ | खुला. |
| ३) | श्री. अनिल शिवाजीराव सांवत | १५/१०/१९९३ | खुला |
| ४) | श्री. अरूण नागोराव खांदोडे | १५/१०/१९९३ | इ.मा.व.(सेवाज्येष्टतेने) |
| ५) | श्री. विनायक दत्तात्रय लोहकणे | १५/१०/१९९३ | खुला |
| ६) | श्री. राम बापू थोरात | १५/१०/१९९३ | खुला |

१) श्री. चंद्रकांत पांडूरंग भोसले यांनी प्रकृती ठीक रहात नसल्याचे कारणास्तव बढती स्वेच्छेने नाकारत असले बाबत दि. २३/०७/२००९ अन्वये पत्र दिले आहे.

२) श्री. सोमवंशी श.रा. यांचे गोपनीय अहवाल प्रतिकूल आहेत.

३) श्री. बाळकृष्ण शिवराम कुंभार यांनी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिला आहे.
त्यामुळे सदर तीन सेवकांची निवड/प्रतिक्षायादीसाठी करण्यात आलेली नाही.

**विषय क्र. ५०१**

संदर्भ :– १) मा. अति महा. आयुक्त (वि) यांचे मआ/उआ/से/६९४, दि. ३०/१२/२००९ चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ६६, दि. १३/१/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि)यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाच्या आरोग्य खात्याकडील ऑक्झिलरी नर्स वर्ग –३ (वे.श्रे.रू.४०००/– ते रू. ९६९५/– + मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत शिफारस केलेल्या निवड/प्रतिक्षायादी वरील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता आरक्षण/अनुशेष इ.बाबीचिारात घेवून मा. महापालिका आयुक्त यांनी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी**

| अ.क्रं. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती घोलप सुरेखा मधुकर | खुला |
| २ | श्रीमती चौधरी सुवर्णा बाळासाहेब | खुला |
| ३ | श्रीमती शेळके अनुराधा सुखदेव | खुला |
| ४ | श्रीमती गणगे छाया दत्तात्रय | खुला |
| ५ | श्रीमती दवंडे सुजाताशंकर | खुला |
| ६ | श्रीमती देवरे स्वाती शांताराम | खुला |
| ७ | श्रीमती कामथे दिपाली दशरथ | खुला |
| ८ | श्रीमती पवार सुजाता अनिल | खुला |
| ९ | श्रीमती ढमाले स्वाती दिलिप | खुला (प्रकल्पग्रस्त) |
| १० | श्रीमती पवार मिनल चंद्रकांत | खुला |
| ११ | श्रीमती अबनावे रूपाली ज्ञानेश्वर | खुला |
| १२ | श्रीमती सरोदे प्रफुल्लता बाळकृष्ण | विमाप्र |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्रं. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती सेनानी कविता हरिश्चंद्र | खुला |
| २ | श्रीमती मेमाने लताबाई किसन | खुला |
| ३ | श्रीमती कोळी जगदेवी नागेंद्र | विमाप्र |
| ४ | श्रीमती सय्यद शबाना हमीद | खुला |
| ५ | श्रीमती इकारे प्रियंका वसंत | खुला |

(ऑक्झिलरी नर्स पदाची प्रतिक्षायादी, निवडयादीवरील उमेदवाराचे आज्ञापत्र नेमणूक आज्ञापत्राचे दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी अस्तित्वात राहील. त्यानंतर ती संपुष्टात आली असे समजण्यात येईल.)

## संकिर्ण

**विषय क्र. ५०२**

पुढील एक महिना म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मान्य करणेबाबतचे मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १५/१/२०१० चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/२/२०१०.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**